# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- १०६७/२०२४

**अपिलार्थी, श्री.मुकुंद गेनु कांबळे**
१४०६/१३ सन फ्लॉवर ई
निसर्ग ग्रीन बी केबीन रोड,
अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक,
सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग,उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.०६.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २५.१०.२०२३ | -- | १३.१२.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २८.०३.२०२४ रोजीच्या अर्जान्वये *"माहिती अधिकारात विचारण्यात आलेली माहिती व प्रथम अपिल यांचे उत्तर/माहिती न मिळाल्यामुळे "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.मनोज व्ही.जाधव, मुख्य लिपीक, सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महागनरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दिनांक २०.०२.२०१४ ते २०.०३.२०१४ या कालावधीत आवक नोंद वही छायांकित प्रति मिळणेबाबत. सदरिल कालावधीत कार्यरत असलेल्या आवक विभागत कार्यरत असलेल्या लिपिकाचे नाव सध्या कार्यरत असलेले कार्यालयास धारण केलेले पद याचा तपशिल. "*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना पाच दिवसात माहिती देण्यात येईल. याचाच अर्थ अपिलार्थी यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती ०८ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शाहू निकाळजे, मुख्य लिपीक, सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महागनरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २५.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ जून, २०२५.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शाहू निकाळजे, मुख्य लिपीक, सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महागनरपालिका

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.मनोज व्ही.जाधव,
मुख्य लिपीक,सामान्य प्रशासन विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.
**<u>यांचे मार्फत प्रत रवाना.</u>**